# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
Date – 09 March 2024
Time 18.10 to 18.20
Language Marathi
**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**
**प्रादेशिक बातम्या**
**दिनांक – ०९ मार्च २०२४ सायंकाळी ६.१०**
****

- सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी आपलं सरकार गतीने काम करत राहणार– हिंगोली इथं शासन आपल्या दारी कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांची ग्वाही.
- छत्रपती संभाजीनगर इथं येत्या बुधवारी स्वनिधी से समृद्धी मेळावा–३३ हजार पथविक्रेत्यांना कर्जवाटपाचं नियोजन.
- उदगीर इथं खाशाबा जाधव कुस्ती स्पर्धेला उत्स्फुर्त प्रतिसाद.

आणि

- ६५ व्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेची बक्षीसं समारंभपूर्व प्रदान.

****

सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी आपलं सरकार सकारात्मक काम करत असून, आगामी काळातही आपलं सरकार याच गतीने काम करेल असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला आहे. आज हिंगोली इथं शासन आपल्या दारी या कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते. रामलीला मैदानावर झालेल्या या कार्यक्रमाला पालकमंत्री अब्दुल सत्तार, खासदार हेमंत पाटील, आमदार तानाजी मुटकुळे, आमदार संतोष बांगर, आमदार राजू नवघरे, विभागीय आयुक्त मधुकरराजे अर्दड, जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. राज्यात आतापर्यंत २२ ठिकाणी शासन आपल्या दारी कार्यक्रम झाले, त्या अंतर्गत पाच कोटी ६५ लाख नागरिकांना थेट लाभ मिळाल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. हिंगोली जिल्ह्यात १३ लाख २७ हजार लाभार्थ्यांची नोंद झाली, हे हिंगोली प्रशासनाचं मोठं यश असल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्र्यांनी काढले. ते म्हणाले...

**मला अभिमान वाटतो. बावीस शासन आपल्या दारीचे कार्यक्रम झाले. या कार्यक्रमामध्ये पाच कोटी पासष्ट हजार लोकांना लाभ मिळाले. या हिंगोली जिल्ह्यात तेरा लाख सत्तर हजार दोनशे तीस लाभार्थ्यांची नोंद झाली आहे. काही लोकांना इथे मिळेल, काही लोकांना थेट मिळेल, म्हणून शासन आपल्या दारी हा कार्यक्रम लोकाभिमुख आणि लोकप्रिय झाला आहे.**

दरम्यान, मुख्यमंत्र्यांनी याप्रसंगी बोलतांना मराठा आरक्षण न्यायालयात टिकेल, असा विश्वास व्यक्त केला. आपण फक्त आरक्षण देऊन आपण थांबलो नाही, तर मराठा समाज शैक्षणिक आणि सामाजिक दृष्ट्या मागास आहे हे सिद्ध करण्यासाठीचे सर्व पुरावे मागासवर्गीय आयोगाकडून जमा केल्याचं, मुख्यमंत्र्यांनी नमूद केलं.

****

आदिवासी बांधवांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केंद्र सरकार विशेष प्रयत्न करत असल्याचं केंद्रीय आरोग्य आणि कुटूंब कल्याण मंत्री डॉ. भारती पवार यांनी म्हटलं आहे. राज्य शासनाच्या आदिवासी विकास विभागातर्फे नाशिक इथं घेण्यात आलेल्या आदिवासी कारागीर मेळाव्यात त्या बोलत होत्या. आदिवासी बांधवांनी सरकार राबवत असलेल्या विविध योजनांचा लाभ घ्यावा, असं आवाहन त्यांनी यावेळी केलं. आतापर्यंत महाराष्ट्रातील २४ आदिवासी कारागिरांना जीआय प्रमाणपत्र वितरीत करण्यात आल्याची माहिती पवार यांनी दिली.

****

२०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी आयकर विभागानं ॲडव्हान्स टॅक्स भरण्यासाठी ऑनलाईन संपर्क अभियान सुरु केलं आहे. जमा केलेल्या कराची रक्कम आर्थिक व्यवहाराशी सुसंगत नसलेल्या व्यक्ती आणि संस्थांना आयकर विभागाद्वारे ई-मेल आणि एसएमएस पाठवून याबाबत सूचित करण्यात येत आहे. देय कर आणि अग्रिम कराची व्यवस्थित पडताळणी करून यावर्षीचा ॲडव्हान्स टॅक्स १५ मार्च पर्यंत जमा करण्याचं आवाहन आयकर विभागामार्फत करण्य़ात येत आहे.

****

पथविक्रेत्यांच्या घरी समृद्धी यावी यासाठी स्वनिधी से समृद्धी मेळावा उपयुक्त ठरणार असल्याचा विश्वास केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉक्टर भागवत कराड यांनी व्यक्त केला आहे. ते आज छत्रपती संभाजीनगर इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. हा मेळावा येत्या १३ मार्च रोजी मराठवाडा सांस्कृतिक मंडळावर होणार असून यामध्ये ३३ हजार पथ विक्रेत्यांना दहा हजार रुपयांचे कर्ज आणि परिचय पत्र वितरीत

करण्यात येणार आहे. या प्रसंगी केंद्र सरकारच्या आठ योजनांसह राज्य सरकारच्या विविध योजनांची माहिती देणारे ३० स्टॉल उभारले जाणार आहेत. कर्ज मिळण्यास सुलभता यावी म्हणून या मैदानावर लोन मेला देखील आयोजित करण्यात आला आहे.

दरम्यान, वेरूळ इथं अहिल्याबाई होळकर यांनी बांधलेल्या कुंडात साऊंड अँड लाईट शोचं उद्घाटन उद्या मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाला होळकरांचे वंशज उपस्थित राहणार असून हा मराठवाड्यातील पहिला उपक्रम असल्याची माहिती डॉ कराड यांनी दिली. शहरातील मजनू हिल इथं "चमकणारे उद्यान" येत्या तीन महिन्यात उभारलं जाणार आहे. त्यासाठी केंद्र सरकारनं दहा कोटीचा निधी उपलब्ध करून दिला आहे. शहरातील प्रत्येक घरावर मनपा क्युआर कोड लावण्यात येणार आहेत. तसंच पैठण रस्त्यावर महानुभव आश्रमासमोरील १५ एकर जमिनीवर लवकरच शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षण केंद्र उभारलं जाणार असल्याची माहितीही डॉ कराड यांनी दिली.

****

आकाशवाणी छत्रपती संभाजीनगरच्या प्रादेशिक वृत्तविभागात, कंत्राटी तत्वावर अर्धवेळ वार्ताहर नियुक्त करण्यासाठी अर्ज मागवण्यात येत आहेत. शैक्षणिक पात्रता, अनुभव, वय या अर्हतेसाठी इच्छुकांनी newsonair.gov.in/vacancies या संकेतस्थळाला भेट द्यावी. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज येत्या १२ मार्चपर्यंत सी एस एन आर एन यू डॉट ए डी एम एन अ‍ॅट जीमेल डॉट कॉम या ईमेलवर, किंवा, कार्यालय प्रमुख, प्रादेशिक वृत्त विभाग- आकाशवाणी, जालना रोड, छत्रपती संभाजीनगर, या पत्यावर पाठवावेत.

****

नवमतदारांसाठी, मेरा पहला वोट देश के लिए, हे मतदार जागरूकता अभियान सरकारने सुरु केलं आहे. दिग्दर्शक आणि अभिनेते अनंत महादेवन यांनी नवमतदारांना मतदान करण्याचं आवाहन केलं आहे.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते परवा मंगळवारी राज्यातल्या रेल्वेशी निगडित ८५ हजार कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांचं लोकार्पण तसंच उद्घाटन होणार आहे. यामध्ये लातूर इथला रेल्वे बोगीबांधणी कारखाना, बडनेरा इथलं रेल्वे बोगी दुरुस्ती कार्यशाळा, पुण्यातली वंदे भारत कोच देखभाल दुरुस्ती कार्यशाळा, रेल्वे

स्थानकावरची जनऔषधी केंद्रं, रेल कोच उपाहारगृहं, सुमारे दीडशे वन स्टेशन वन प्रॉडक्ट स्टॉल, आदी उपक्रमांचा समावेश आहे. दहा वंदे भारत रेल्वेंना पंतप्रधान दूरदृश्य यंत्रणेच्या माध्यमातून हिरवा झेंडा दाखवणार आहेत.

****

लातूर जिल्ह्यातल्या उदगीर इथं सुरु असलेल्या खाशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत फ्री स्टाईल प्रकारात कोल्हापूरचा रणजित पाटील, पुण्याचा निखिल कदम आणि साकेत यादव यांनी सुवर्णपदकं पटकावली. लातूरच्या आकाश गदेनं रौप्यपदकं पटकावलं. ग्रीको रोमन प्रकारात कोल्हापूरचा वैभव पाटील, पुणे जिल्ह्याचा दिग्विजय भोंडवे यांनी सुवर्णपदकावर मोहोर उमटवली.

दोन महाराष्ट्र केसरी आणि एक वेळची राष्ट्रीय पदकविजेती सांगलीची प्रतिक्षा बागडी हिने महिलांच्या ७६ किलो वजन गटात कोल्हापूरच्या वेदिका सासणेचा पराभव करत सलग दुसऱ्या वर्षी सुवर्णपदक पटकावलं आहे.

****

धाराशिव इथं नोव्हेंबर महिन्यात झालेल्या ६५ व्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचं बक्षीस वितरण आज करण्यात आलं. या सोहळ्यापूर्वी महाराष्ट्र केसरी स्पर्धेचा विजेता शिवराज राक्षे आणि उपविजेता हर्षवर्धन सदगीर यांची मिरवणूक काढण्यात आली. महाराष्ट्र केसरी शिवराज राक्षे याला महिंद्रा स्कॉर्पियो तर उपविजेता नाशिकचा हर्षवर्धन सदगीर यांना महिंद्रा ट्रॅक्टर मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आलं. या स्पर्धेतील इतर २० गटातील विजेत्यांना पारितोषिक म्हणून बुलेट तसंच शाईन दुचाकी मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आल्या.

****

नांदेड जिल्ह्यात बिलोली इथं आज एकोणिसावं राज्यस्तरीय लोकसंवाद ग्रामीण साहित्य संमेलन घेण्यात येत आहे. प्रसिद्ध लेखक मनोज बोरगावकर यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या या संमेलनात प्राचार्य डॉ गोपाळराव कदम यांना लोकसंवाद पुरस्कार प्रदान करण्यात आला. या निमित्तानं होत असलेल्या कथाकथन, कविसंमेलनाला साहित्य रसिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.

****

धाराशिव जिल्ह्यात या महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात उन्हाच्या तीव्रतेमुळे पाणीटंचाईत दिवसेंदिवस वाढ होत आहे. जिल्ह्यात सध्या ११ टँकर आणि ५४ विंधन विहीरी आणि विहीर अधिग्रहणातून पाणीपुरवठा केला जात आहे. या

पाणीटंचाईच्या संकंटांचा सामना करण्यासाठी टँकर आणि विंधन विहीरी आणि विहीरींच्या अधिग्रहणाचे अधिकार तहसीलदारांना देण्यात आले आहेत.

****

मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी जनजागृतीपर उपाययोजना राबवण्याचे निर्देश छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले आहेत. स्वामी यांनी आज कन्नड तहसील कार्यालयात लोकसभा निवडणूक – २०२४ संदर्भात आढावा बैठक घेतली, त्यावेळी ते बोलत होते. दरम्यान, कन्नड तालुक्यातल्या जलसंधारण कामाची स्वामी यांनी माहिती घेतली. आर्ट ऑफ लिव्हींग संस्थेने विकसित केलेल्या जलतारा आराखड्याचं स्वामी यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आलं. उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करण्याची सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी केली.

****